# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६१ ०६०२, २२६४ ११५०/५१, ३०३३३४४७फॅक्स - २२६९ २१०२.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


अधिसूचना

क्रमांक: २अ/एडीएम/२०१०/२८६८
दिनांक : 14 SEP 2010

**व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या कट ऑफ डेट व अपलोडिंग डेटबाबत**

राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या कट ऑफ डेट आणि अपलोडिंग डेट खाली नमूद केल्यानुसार जाहीर करण्यात येत आहेत.

| Name of Course | Revised Cut off Date | Uploading Date |
|---|---|---|
| **1st year M.Pharmacy** | 18.09.2010 | 25.09.2010 |
| **1st year MBA/MMS** | 25.09.2010 | 30.09.2010 |
| 1st year MCA | 15.09.2010 | 20.09.2010 |
| 1st year B. E. | 25.09.2010 | 30.09.2010 |
| 1st year B. Pharmacy | 18.09.2010 | 25.09.2010 |
| 1st year B.HMCT | 18.09.2010 | 25.09.2010 |
| 1st year B.Arch. | 18.09.2010 | 25.09.2010 |
| Direct 2nd year Degg. Engg. | 04.10.2010 | 09.10.2010 |
| Direct 2nd year B. Pharmacy | 30.09.2010 | 04.10.2010 |

वर नमूद केलेल्या दिनांकानुसार सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांनी प्रवेश करावेत व प्रवेशित उमेदवारांची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करावी. जर प्रवेश अपलोड करत असताना तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास संबंधित विभागीय कार्यालयात विहीत मुदतीत संपर्क साधून अडचणीचे निराकरण करून माहिती अपलोड करावी. वरील मुदतीत प्रवेश न करणा-या व प्रवेशाची माहिती अपलोड न करणा-या संस्थांवर शासन नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

( डॉ. एस के महाजन )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in

परिपत्रक

क्रमांक : १०/एनजीपी/ केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया/२०१०/ ६८८
दिनांक : 15 SEP 2010

विषयः- पोस्ट एस. एस. सी. व एच. एस. सी. च्या प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट असलेल्या व नसलेल्या विनाअनुदानित संस्थांनी रिक्त जागा संस्थास्तरावर भरणेबाबत...

शैक्षणिक वर्ष २०१०-११ मधील पोस्ट एस. एस. सी. व पोस्ट एच. एस. सी. च्या प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमांच्या केंदीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट असलेल्या व नसलेल्या विनाअनुदानित संस्थांना कळविण्यात येते की, त्यांनी केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त असलेल्या जागा संस्थास्तरावर भरण्यासाठी वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन भरण्यात याव्यात. तसेच यासाठी पोस्ट एस. एस. सी. प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा शैक्षणिक वर्ष २०१०-११ नियमावलीतील Annexure – 6 व पोस्ट एच. एस. सी. प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा Annexure – 4 मध्ये देण्यात आलेल्या मार्गदर्शनानुसार सदरची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

( डॉ. सु.का. महाजन )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

प्रतः- १. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे यांना कळविण्यात येते की, त्यांनी विभागीय स्तरावर विनाअनुदानित संस्थांना सदर बाब निदर्शनास आणुन देण्यात यावी व आवश्यक ती कार्यवाही करावी.

२. का. क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, ३०३३३४४७फॅक्स - २२६९ २१०२.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


**अधिसुचना**

क्रमांकः २अ/एडीएम/एमबीए/२०१०/२८९२
दिनांक : १६/०९/२०१०

**विषय : प्रथम वर्ष एमबीए/एमएमएस पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत**

शैक्षणिक वर्ष २०१०-११ मधील प्रथम वर्ष एमबीए/एमएमएस पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानीत संस्थांमधील रिक्त जागांवर विद्यार्थ्यांना व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमाची संधी उपलब्ध व्हावी, याकरिता रिक्त जागा भरण्याबाबत शासनाने शासन पत्र क्र. टीईएम२०१०/(२३७/१०)/तांशि-४, दिनांक १५ सप्टेंबर २०१० अन्वये खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

१. शैक्षणिक वर्ष २०१०-११ मध्ये एमबीए/एमएमएस अभ्यासक्रमाच्या सद्य:स्थितीत रिक्त राहिलेल्या जागा सीईटी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमार्फत प्राथम्याने भरण्यात याव्यात.
२. वरिल १) प्रमाणे कार्यवाही करुन जागा रिक्त राहिल्यास CET/GDPI न दिलेल्या इच्छुक विद्यार्थ्यांमधून त्यांच्या पदवी परिक्षेत संपादन केलेल्या गुणांच्या आधारे त्या जागा भरण्यात याव्यात.

उपरोक्त शासनाच्या आदेशानुसार राज्यातील सर्व एमबीए/एमएमएस पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानीत संस्थांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यांत येत आहेत.

१. शैक्षणिक वर्ष २०१०-११ मध्ये एमबीए/एमएमएस अभ्यासक्रमाच्या सद्य:स्थितीत रिक्त राहिलेल्या जागा प्रवेश नियमावलीतील नियम क्र. २ मध्ये नमूद केलेल्या सीईटी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमार्फत प्राथम्याने भरण्यात याव्यात.
२. वरिल १) प्रमाणे कार्यवाही करुन जागा रिक्त राहिल्यास CET/GDPI न दिलेल्या इच्छुक विद्यार्थ्यांमधून त्यांच्या पदवी परिक्षेत संपादन केलेल्या गुणांच्या आधारे त्या जागा भरण्यात याव्यात.

सदर कार्यवाहीमुळे कोणत्याही विद्यार्थ्यावर अन्याय होणार नाही, याची संबंधित संस्थांनी दक्षता घ्यावी. तसेच ज्या विद्यार्थ्यांची यासंबंधी काही तक्रार असल्यास त्यांनी संबंधित विभागाच्या तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांत लेखी तक्रार करावी. संस्था दोषी आढळल्यास पुढील होणा-या कारवाईस संबंधित संस्था जबाबदार राहिल, याची नोंद घ्यावी.

सही/-
( डॉ. एस के महाजन )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई